डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा बौध्द धम्म निवडीमागील ऐतिहासिक दृष्टिकोन

प्रा. अरविंद म. पुनवटकर
डॉ. हरिभाऊ आदमने कला व वाणिज्य महाविद्यालय,
सावनेर, जि. नागपूर.
punwatkararvind@gmail.com

चक्रवर्ती सम्राट अशोकाच्या आगमनानंतर इ.स. तिसऱ्या शतकापूर्वीपासून सुमारे हजार वर्षापेक्षा अधिक काळ भारतात बुध्द धर्माने वर्चस्व गाजविले. हा १००० वर्षाचा कालावधी भारताच्या इतिहासामध्ये सर्वांगाणे सुवर्णयुग गणला गेला. भारताने या काळात अनेक क्षेत्रामध्ये प्रगतीची उंच शिखरे गाठलीत. यात प्रामुख्याने कला. साहित्य, शिक्षण, थोरामोठयांविषयीची मर्यादापूर्ण आदर भावना, धर्मनिष्ठा यांचा विशेषत्वाने उल्लेख करता येईल. दुर्दैवाने इ.स. च्या सातव्या शतकानंतर नानाविध कारणांमुळे बौध्द धर्माचा ऱ्हास होण्यास हळूहळू सुरूवात झाली. बाराव्या शतकापर्यंत बुध्दाचा हा धम्म ज्या देशात जन्म झाला, त्याच ठिकाणी पूर्णपणे रसातळाला गेला. पुढच्या सात शतकापर्यंत बुध्द धम्माचे भारतामध्ये अस्तीत्वच उरले नाही. या महान बुध्दाचे नाव देखील लोकं पूर्णपणे विसरले. त्याच बरोबर समकालीन बुद्ध राजे, संत आणि अनेक बौध्द विद्वान यांनी आपल्या अमोध कतृत्वाने भारतीय संस्कृतीस उत्तुंग शिखरावर नेले.[१] १८९१ मध्ये अनागरिक धम्मपाल या सिंहली बौद्ध या यात्रेकरूचे सारनाथ आणि बौध्दगया येथील परिस्थिती पाहून मन व्यथीत झाले. त्यांनी १८९१ मध्ये महाबोधी सोसायटी ऑफ इंडियाची स्थापना केली. महाबोधी नावाच्या मुखपत्राने बौध्द धम्माचा ४० वर्ष प्रचार केला. कोसंबी, बोधानंद, आनंद, कौसल्यायन, राहूल सांस्कृत्यान, जगदीश काश्यप यासारख्या विभूतींनी धम्मचक्राची गती अधिक गतीमान केली. इंग्रजांच्या, पुरातत्व, संशोधक व विद्वानांनीही महान बौद्ध संस्कृतीचे अवशेष शोधून भारतभूमीला तिच्या महान संस्कृतीची पुनश्च ओळख करून दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर नीतिवर आधारलेला धम्म स्वीकारण्याची घोषण करतात. त्यावेळी त्यांचा कल बौध्द धम्माकडे वळतो. धर्माच्या पसाऱ्यात बौध्द धम्माचे स्वरूप फार भिन्न आहे. याची स्पष्ट जाणीव डॉ. बाबासाहेबांना होते, ते म्हणतात की, ''बौध्द धर्माची ईश्वराची संकल्पना नाही. ईश्वर या सृष्टीचा निर्माणकर्ता व नियंत्रक आहे, असे तो मानीत नाही, विश्व स्वयंभू आहे. ते कार्यकारण भावाच्या नियमाप्रमाणे चालते असे गौतम बुध्दाचे सांगणे होते. बुध्दाची ही कल्पना आधुनिक जीवनाशी जुळणारी आहे. आपण स्वत: परमेश्वर आहोत असा गौतम बुध्दाने दावा केलेला नाही. तो माणूस आहे, शुध्दोदन राजाचा पुत्र आहे. ख्रिस्त हा परमेश्वराचा पुत्र आहे. अशी ख्रिस्ती लोकांची श्रध्दा आहे. महंमद पैगंबर हे परमेश्वराने पृथ्वीवर धाडलेले अनोखे प्रेरित होते, असे सर्व मुसलमान मानतात. 'भगवतगीते'त श्रीकृष्णाने आपण प्रत्यक्ष परमेश्वर आहोत असे अर्जुनाला सांगितले आहे. उलट बुद्धाची शिकवण बुध्दिनिष्ठेवर आधारलेली आहे. तिच्यामध्ये शब्दप्रमाण्याचा महत्व नाही. माझा मार्ग तुमच्या बुद्धीला पटला तरच स्वीकारा असे बुद्धाचे सांगणे होते. त्यांनी

सांगितलेल्या व्यक्तिविकास आणि समानता या नितीमूल्यांच्या प्रकाशात बदलत्या परिस्थितीनुसार आपला मार्ग शोधून काढण्याचा प्रत्येक समाजाला अधिकार आहे, असे प्रतिपादन होते.''[२]

बौध्द धम्मामध्ये पूजाअर्चा, जपजाप्य, यज्ञयाग इत्यादी ईश्वर विषयक कर्मकांडाशी बुध्दाने सांगितलेल्या धम्माचा काडीचाही संबंध येत नाही. ईश्वर विषयक सारे कर्मकांड करणे म्हणजेच धर्म होय, हे बुध्दाने सपशेल नाकारले आहे. ईश्वर विषयक कर्मकांडाऐवजी तथागताने आचारशीलेची प्रतिष्ठापना धर्माचा गाभा म्हणून केलेली आहे. ब्राम्हण आचार्य व तथागत बुध्द या दोघांनी जरी धर्म हा एकच शब्द वापरला असला तरी दोघांच्याही मूलभूत अर्थामध्ये मात्र वर निर्देशल्या प्रमाणे फरक आहे. तथागत बुध्द हाच असा एक धर्मवेत्ता होऊन गेलेला आहे की, ज्याने नितीतत्वांना धर्माचा एक मूलभूत पाया मानलेला आहे.[३]

बाबासाहेबांनी बौध्द धर्म स्वीकारला, याचे कारण असे की, बुध्द ही केवळ हिंदूविरोधी प्रतिक्रया नव्हे, बुध्दपूर्व आणि बुध्दोत्तर जन्मलेल्या सर्व जागतिक धर्मविरोधी एक सामर्थ्यवान प्रतिक्रिया आहे. हिंदू सकट सर्व शब्दप्रामाण्य, परमेश्वराचे अस्तित्व, आत्म्याचे अस्तित्व, पूनर्जन्म आणि कर्मसिध्दांत यावर आधारलेले आहेत. बुध्दाने तर हे सारे नाकारले, मग तो धर्म कसा होऊ शकतो? शब्दप्रामाण्य नाकारणारा विचार धर्म कसा असू शकतो? बाबासाहेबांनी त्याला धर्माऐवजी धम्म हे नाव दिले. त्याला एक 'जीवनमार्ग मानला' बुध्दाच्या धम्माला धर्म कल्पने विरोधीचा एक समर्थ विचार, जुन्या मूल्यांना ध्वस्त करून नवीन मूल्यांना सामोरे जाणारा गतिमान सिध्दांत आणि माणसाच्या जाणिवेला आमूलाग्र परिवर्तन करणारा विज्ञाननिष्ठा अनाग्रही जीवनमार्ग मानले. तरच बाबासाहेबांना अभिप्रेत असणाऱ्या लोकशाही, समाजवादी विचारांसाठी आंदोलने उभारणे, संघर्ष करणे आणि शोषणविहीन समाजनिर्मितीचे स्वप्न पाहता येणे शक्य आहे. खऱ्या लोकशाही समाजवादासाठी 'बौध्द धर्म' हे दूसरे महत्वाचे साधन वापरावे, असे बाबासाहेबांचे मानने होते.[४]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी, गुलामी आणि दास्यातून आपल्या दलित–शोषित बांधवांची मुक्तता करता येईल, असा सुयोग्य धर्म शोधण्यासाठी आपली शक्ती पणाला लावली. यात त्यांना यश प्राप्त झाले. बाबासाहेबांनी त्यांना अस्पृश्यतेच्या जोखडातून मुक्त करून स्पृश्य बनविले. तिरस्कृत जीवन बदलून प्रतिष्ठित नागरिकाचा दर्जा मिळवून दिला. त्यांना आर्थिक, सामाजिक आणि राजकीय हक्क मिळवून देऊन राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेतले. एवढेच नव्हे, तर स्वयंशिल्पकार असलेल्या भारतीय राज्यघटनेत त्यांचे सर्व अधिकार अबाधित ठेवले. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जेव्हा बौध्द धर्म स्वीकारण्याचे आवाहन केले, तेव्हा दलित जनतेचा त्यांना भरघोस पाठिंबा मिळाला.

डॉ. आंबेडकरांनी २० वर्षापेक्षा अधिक काळ सखोल अभ्यास करून बुध्द धम्माची निवड केली. बुध्द धम्माचा केंद्रबिंदू 'माणूस' असून 'नैतिकता' त्याचा पाया आहे. तसेच मानव कल्याण हा बुध्द धम्माचा उद्देश असल्यामुळे बाबासाहेब या धम्मामुळे खूप प्रभावित झाले. हा धम्म निवडण्याचे अजून एक कारण असे की, हा धम्म प्रज्ञा (ज्ञान), करूणा (दया) आणि समतेची शिकवण देतो. तसाच तो बुध्दिवादी असून स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाची शिकवण देणारा धर्म आहे.[५]

सर्व प्रकारचे पापकर्म न करणे व सर्व प्रकारचे पुण्यकर्म करणे हा बुध्दाचा धम्म आहे. बौध्द जीवनमार्ग संक्षिप्ततेत मानवी कल्याणाचा मार्ग आहे. १) शुभ कार्य करीत रहा २) लोभ व तृष्णेच्या आहारी जाऊ नका ३) दुसऱ्यास (क्लेष) त्रास देऊ नका ४) द्वेष भावना, क्रोध भावना ठेऊ नका व वैरभाव विसरा ५) पापकर्मापासून दूर राहा व पूण्यकर्म करीत रहा ६) आत्म संयमी व्हा, बुध्दीवान व न्यायी व्हा, सद्संगती धरा ७) विवेकाने वागा, सावधान रहा, आस्थायुक्त व धैर्यशील राहा ८) दारिद्रय हे दु:खाचे उगमस्थान आहे. परंतु श्रीमंतीने सुख लाभेलच असे नाही. सुख हे उच्च विचार व राहणीने मिळते. ९) लोभ हा भयंकर रोग आहे तर आरोग्य ही सर्वश्रेष्ठ देणगी आहे. १०) समाधान सर्वश्रेष्ठ संपत्ती आहे तर विश्वास सर्वश्रेष्ठ नाते आहे आणि निर्वाण सर्वश्रेष्ठ सुख आहे. ११) खोटे बोलू नये व खोटे बोलण्यास दुसऱ्यास प्रवृत्त करू नये. १२) सम्यक मार्ग बहुजन सुखासाठी आहे. १३) बौध्द धम्मात प्रार्थना, तिर्थयात्रा, कर्मकांड, विधी, यज्ञ यास स्थान नाही.[६]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, मी स्वत:ला भगवान बुध्दापेक्षा मोठा समजत नाही. मी एक लहान माणूस आहे. मी जगाला काही नवीन विचार दिला नाही, मी एवढेच समजतो की, याचे जे धम्मचक्र या देशात गेली हजार वर्षे स्थगित होऊन गेलेले होते ते पुन्हा प्रवर्तित करण्याचे भाग्य मला लाभले. तुम्ही हिंदूनी आपल्या आत्मघातकी वृत्तीमुळे ख्रिस्ती आणि इस्लाम धर्म या देशात येऊ दिले आणि वाढू दिले. इतके की, त्यामुळे अखेर देशाचे तुकडे पाडण्याची पाळी आली. उलट, बौध्द धर्मासारखा जो अत्यंत तर्कशुध्द असा श्रेष्ठ धर्म या भूमीत उदयास आला, त्या भारतीय धर्माला मात्र तुम्ही देशोधडीला लावले. मी त्या धर्माला पुन्हा त्याच्या घरी परत आणला, याचा मला अभिमान वाटतो. तुम्हा हिंदूना असे वाटत होते की, धर्मांतराची घोषणा करून मी तुमच्या धर्मावर, संस्कृतीवर आणि देशावर कुऱ्हाड घातली आहे पण आता तुम्हाला कळून येईल की, माझे धर्मांतर हे शुध्द भारतीय आहे आणि भारतीय संस्कृतीच्या गौरवाला ते कारण होणार आहे. १९३५ सालच्या आक्टोबरमध्ये मी धर्मांतराची घोषणा केली, तेव्हा तुम्ही लोकांनी मला शिव्या घातल्या. पण आता वीस वर्षानी तुम्हाला हे कळून आले असेल की, भारतीयत्वावरील निष्ठेच्या बाबतीत मी काही तुम्हा लोकांकडून कमी नाही कदाचित जास्तच ठरेन. कारण या देशाने बौध्द धर्माच्या रूपाने सगळया जगाला जी तत्वज्ञानाची अप्रतिम देणगी दिली, ती तुम्ही हिंदूनी मुर्खपणाने झिडकारली, ती देणगी मी देशाला पुन्हा मिळवून दिली, याचा मला अभिमान आणि आनंद आहे.[७]

बौध्द धम्माची निवड करण्यामागचे सर्वात महत्वाचे कारण हेच होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या मातीशी इमान राखणारे एक सच्चे राष्ट्रभक्त होते. आणि म्हणूनच धर्म स्वीकारतांना त्यांनी आपल्या देशाचा, आपल्या संस्कृतीचा विचार प्रथम केला, आपल्या कोटयावधी अनुयांयाना आपण ज्या मार्गाने घेवून जाणार आहोत, तो मार्ग भारत भूमीतीलच असावा आणि याच संस्कृतीचे तो अविभाज्य अंगही असावा हा विचार त्यांनी शिरोधार्ह मानला. असे नसते तर जगातील एखाद्या जागतिक किर्तीच्या धर्मात प्रवेश करून आपला अतोनात आर्थिक फायदा त्यांना करून घेता आला असता. परंतु त्यांचे हे धर्मांतर आर्थिक फायद्यासाठी नव्हतेच.[८] बाबासाहेबांनी राष्ट्रातील, या भूमीतील मानवतावादी धम्म निवडला व आपल्या राष्ट्रप्रेमाची प्रचिती दिली. देशप्रेम व धर्मप्रेम यांची सुंदर सांगड घालून भक्कम व एकात्मिक आधुनिक भारताची पायाभारणी केली.

संदर्भ ग्रंथ सूची –

- मनिषा पाटणकर (संपादक) – 'लोकराज्य', शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, ऑक्टो. २००६, पृष्ठ क्र. ३१.
- नलिनी पंडित – 'आंबेडकर', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९९६, पृष्ठ क्र. १५८.
- हरी नरके, म. ल. कासारे, एन. जी. कांबळे, अशोक गोडघाटे (संपादक) – डॉ. बाबासाहेब यांची पत्रकारिता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, प्रथमावृत्ती, २००५, पृष्ठ क्र. ३७६.
- डॉ. योगेंद्र मेश्राम – 'दलित साहित्य, उमग आणि विकास', मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९८, पृ.क्र. २८.
- मनिषा पाटणकर (संपादक) – 'लोकराज्य', शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, ऑक्टो. २००६, पृष्ठ क्र. ३२.
- रविंद्र जनबंधु, हरिष गाडगे (संपादक) – धम्मनिकाय स्मरणिका, २०१६, पृष्ठ क्र. ५८.
- शशिकांत पैठणकर (मुख्य संपादक) – 'लोकराज्य', माहिती व जनसंपर्क महासंचलनालय, मुंबई, एप्रिल १९८१, पृ.क्र. ३८.
- डॉ. डी. बी. मेश्राम – डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर प्रकाशिका, शारदा गेडाम, नागपूर, प्रथम आवृत्ती, २००६, पृष्ठ क्र. २४९.